# College of Excellence with Potential




**College of Excellence with Potential**

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर राबविण्यात येणारा करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, उद्योजकता विकास, कौशल्य प्रशिक्षण, भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) व आर्थिक साक्षरता या घटकांवर आधारित सातत्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य करिअर कट्टाच्या माध्यमातून केले जाते.

तथापि, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, कोविडनंतर निर्माण झालेली विद्यार्थी गळती, ग्रामीण व निमशहरी भागातील लहान महाविद्यालयांची मर्यादित भौतिक व आर्थिक क्षमता तसेच लायब्ररी व इन्क्युबेशन सेंटरसाठी आवश्यक जागेचा अभाव या सर्व कारणांमुळे अपेक्षित १०० Center of Excellence स्थापन करण्याचे उद्दिष्ट पूर्णतः साध्य होऊ शकले नाही.

या पार्श्वभूमीवर, Center of Excellence बनू न शकणाऱ्या परंतु कार्यक्षमता व विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी आवश्यक इच्छाशक्ती असलेल्या महाविद्यालयांसाठी एक स्वतंत्र, समावेशक व लवचिक योजना म्हणून "College of Excellence with Potential (CoE-P)" ही योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

## २) पात्रता व सहभाग

- १००० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असणारी महाविद्यालये वैयक्तिक स्वरूपात किंवा क्लस्टर पद्धतीने या योजनेत सहभागी होऊ शकतील.
- क्लस्टर पद्धतीत सहभाग घेतल्यास संबंधित महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार (MoU) करणे अनिवार्य राहील.
- सामंजस्य करारानुसार योजना राबविणे प्रत्येक सहभागी महाविद्यालयासाठी बंधनकारक राहील.
- सामंजस्य करार झाल्यानंतर संबंधित क्लस्टरमधील महाविद्यालयांना पाच वर्षांपर्यंत क्लस्टरमधून बाहेर पडता येणार नाही.

## ३) आर्थिक तरतूद व पर्याय

या योजनेअंतर्गत संबंधित महाविद्यालयास वस्तू स्वरूपातील सुविधा किंवा कार्यशाळा यांपैकी योग्य पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य राहील. त्यानुसार मागणीपत्र (Demand Letter) क्लस्टर / संबंधित महाविद्यालयाकडून सादर करणे आवश्यक राहील.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार नोंदणीकृत आर्थिक तरतूद करण्यात येईल. संबंधित महाविद्यालयांना मंजूर

करण्यात येणारी प्रोत्साहन पर रक्कम खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | प्रोत्साहन रक्कम (वस्तू/कार्यशाळा) |
|---|---|---|
| १ | १५० किंवा त्याहून अधिक | ९,०००/- |
| २ | ३०० किंवा त्याहून अधिक | १८,०००/- |
| ३ | ५०० किंवा त्याहून अधिक | ३०,०००/- |
| ४ | ७५० किंवा त्याहून अधिक | ५०,०००/- |
| ५ | १००० किंवा त्याहून अधिक | ६०,०००/- |

## ४) योजनेचे प्रमुख घटक

### (अ) उद्योजकता विकास व स्टार्टअप प्रोत्साहन

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची मानसिकता विकसित करणे व स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी खालील उपक्रम राबविण्यात येतील :

**अविष्कार स्पर्धा पूर्वतयारी कार्यशाळा**

- प्रति महाविद्यालय / क्लस्टर १५,०००/- पर्यंत
- संकल्पना विकास, प्रोजेक्ट मार्गदर्शन व प्रेझेंटेशन कौशल्य प्रशिक्षण

**Startup Summit आयोजन**

- जिल्हास्तरीय: ३०,०००/-
- विभागीय: ५०,०००/-

**स्टार्टअप मेंटॉरशिप**

- ऑनलाइन / ऑफलाइन मार्गदर्शन
- आयडिया व्हॅलिडेशन
- बिझनेस मॉडल विकसित करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शन

### (ब) सुविधा व वस्तू आधारित प्रोत्साहन

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी उपक्रमांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खालील वस्तू / सेटअप उपलब्ध करण्यात येतील:

- Skill Training Modules
- Kick Start Setup
- एक दिवसीय कार्यशाळा आयोजन
- Book Storage for Library
- Welcome Board
- Printer
- Karaoke System
- Round Table & Chairs

- Recording Corner
- Sanitary Pad Vending Machine

## ५) नियम व अटी

या योजनेत सहभागासाठी खालील नियम व अटी बंधनकारक राहतील :

- संबंधित महाविद्यालयाचा करिअर कट्टा सोबत सामंजस्य करार (MoU) असणे आवश्यक आहे.
- सामंजस्य करारामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी कार्यरत (Active) असणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयामध्ये करिअर संसदेची स्थापना केलेली असणे आवश्यक आहे.
- करिअर कट्टा मासिकाचे सभासदत्व असणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयामध्ये किमान दोन महाविद्यालयीन समन्वयकांची नियुक्ती केलेली असणे आवश्यक आहे.
- शासन निर्देशानुसार प्रवेश शुल्कामध्ये करिअर कट्टा शुल्काचा समावेश करण्यात आलेला असावा.
- १४ जून ते ३० नोव्हेंबर या कालावधीत नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारे महाविद्यालयांची निवड करण्यात येईल.
- एका क्लस्टरमध्ये कमाल ५ महाविद्यालयांचा सहभाग करता येईल.
- २० किमी परिसरातील महाविद्यालयांचा क्लस्टरमध्ये समावेश करता येईल.
- निवड झालेल्या महाविद्यालयांसाठी निवड कालावधी एक वर्षाचा राहील. प्रतिवर्षी यादी नव्याने घोषित करण्यात येईल व त्या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयातील नोंदणीकृत विद्यार्थी संख्येनुसार योजनेचा लाभ उपलब्ध होईल.
- या योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे तसेच Add-on Courses चे अहवाल नियमित व वेळेत सादर करणे महाविद्यालयांना बंधनकारक राहील.
- एका वेळी महाविद्यालय Centre of Excellence किंवा 'College of Excellence with Potential' यांपैकी फक्त एका योजनेतच सहभागी होऊ शकेल. एकाच वेळी दोन्ही योजनांमध्ये सहभाग घेण्यास अनुमती राहणार नाही.

★ ★ ★